# इस्रायलचे राजदूत नाओर गिलॉन यांची बिट्स पिलानी गोवाला भेट



**सांकवाळ : इस्रायलचे राजदूत नाओर गिलॉन व बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू चर्चा करताना.**

प्रतिनिधी

वास्को

इस्रायलचे राजदूत नाओर गिलॉन यांनी नुकतीच सांकवाळ येथील बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसला भेट दिली. या भेटीत त्यांनी बिट्स पिलानीच्या विद्यार्थ्यांशी भारत-इस्रायल संबंधाविषयी चर्चा केली.

बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. सुमन कुंडू, प्रा. राजेश मेहरोत्रा, डॉ. अनिर्बन रॉय यांनी राजदूतांचे स्वागत केले. नाओर गिलॉन यांनी इस्रायलची संस्कृती, इतिहास, आंतरराष्ट्रीय संबंध याविषयी माहिती दिली. भारत आणि इस्रायलमधील द्विपक्षीय संबंध विकसित झाले आहेत. यावरही त्यांनी चर्चा केली.